# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - 413 255, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७०/७१/७२/७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: affiliation@sus.ac.in विस्तारित क्र.: १२२




## शैक्षणिक, संशोधन व विकास (संलग्नता विभाग)

### अत्यंत महत्वाचे/तातडीचे परिपत्रक

**विषय :** **महाविद्यालयांचे मूल्यांकन (Accreditation) व पुनर्मूल्यांकन (Re-accreditation) करण्याबाबत.**

**वाचा :** १) शासन निर्णय क्र. २०१०/(२०/१०)/विशि-३, दिनांक ०८/१०/२०१०.

२) विद्यापीठ पत्र क्र. SOL/BCUD/AFFI/६६६/५६०३, दिनांक १४/१०/२०१०.

३) विद्यापीठ पत्र क्र. SOL/BCUD/AFFI/८५५/६६८८, दिनांक ११/११/२०१०.

४) विद्यापीठ पत्र क्र. SUS/VC/१७३, दिनांक २०/११/२०१३.

५) विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/१८४४, दिनांक १९/०५/२०१४.

६) विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/३७८४, दिनांक २१/०७/२०१५.

७) विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/३५२२, दिनांक ०६/०४/२०१६.

८) विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/७८६९, दिनांक १६/०८/२०१६.

९) विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०१९/८२१५, दिनांक २५/१०/२०१९.

१०) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. अ.शा.क्र. के आर ए-२०२२/प्र.क्र.-१९६/वि, दिनांक १९/०७/२०२२.

११) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. एनजीसी/२०२२/नॅक/ अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/१०१००, दिनांक २७/०७/२०२२.

१२) मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या पत्र क्र. विससं/उशि/सोविसो/२०२२/१५२८, दिनांक ०३/०८/२०२२.

१३) विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/नॅक परिपत्रक/२०२२-२३/६२९७, दिनांक १८/०८/२०२२.

१४) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. एनजीसी/२०२२/नॅक/अशा. अनु.म.वि./औवि/मवि-३/१२२०२, दिनांक ०३/१०/२०२२.

महाराष्ट्र शासनाच्या संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशासनाकडून संदर्भ क्र. २ ते ९ व १३ अन्वये शासनाच्या धोरणानुसार महाविद्यालयाचे नॅक, यापुढील Cycle नुसार पुर्नमूल्यांकन व मानांकन करुन घेण्याच्या दृष्टीने कळविण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी संदर्भ क्र. १४ अन्वये मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य व संबंधित संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांना लिहिलेल्या पत्राची प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी विद्यापीठ प्रशासनास पाठविलेली आहे. सदर पत्रात महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग यांनी अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यांना नॅक मूल्यांकन करुन घेणेबाबत वेळोवेळी शासन निर्णय, शासन परिपत्रके, सूचनापत्र निर्गमित केली असून त्यानुसार पुढील ६ महिन्यात कार्यवाही न केल्यास शासन नियमांनुसार कारवाई करण्यात येईल असे कळविले आहे. (प्रत संलग्न)

तरी सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १४ येथील मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या पत्राची गंभीर दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करावी.

आदेशान्वये,

०७/११/२२

**( योगिनी घारे )**

**कुलसचिव**

जा. क्र. : पुअहोसोविसो/संलग्नता/नॅक परिपत्रक/२०२२-२३/ 8623

दिनांक : 7 NOV 2022

प्रति,

**मा. प्राचार्य / प्राचार्या,**

सर्व संलग्नित महाविद्यालये,

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**प्रत :** १) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे.

२) मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर.

महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.

www.dhepune.gov.in फोन नं. ०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ Email: mavi.dhepune@gov.in

एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/ 92-202 दि. .०९.२०२२

(ई-मेलद्वारे तात्काळ)

03 OCT 2022

प्रति,

१. अध्यक्ष / सचिव, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे संबंधित संस्था (सोबत यादी.)
२. प्राचार्य, अशासकीय अनुदानित महाविद्यालये (सोबत यादी.)

विषय - आपल्या महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन एकदाही न झालेबाबत...

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur. Inward No. 253. 15 OCT 2022 Asst. Registrer Dy. Registrar AR & D

संदर्भ -
१. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१०/(२०/१०)/विशि-३, दि ०८आक्टों.,२०१०.
२. संचालनालयाचे पत्र क्र. एनजीसी/२०१९/नॅक/सर्वविभाग/औवि/मवि-३/१३२२४,दि.२६.०९.२०१९ व समक्रमांक /सर्वअनु.म.वि.(११८)/जेडी/औवि/मवि-३,दि.०१.०४.२०१९.
३. संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/२०१९/नॅक/सर्व अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/६४६९,दि.२५.५.२०२१.
४. संचालनालयाचे पत्रक्र.एनजीसी/२०१९/नॅकमूल्यांकन-बैठक(१०५)/औवि/मवि-३/१३४२८,दि.१६.११.२०२१
५. संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/२०२१/नॅक/राज्यस्तरीय वेबिनार/औवि/मवि-३/१४०६९,दि.८.१२.२०२१.
६. संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/२०२२/नॅक-(PAC)/औवि/मवि-३/३५७५,दि.०५.०४.२०२२.
७. संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/५२२६ दि.१७.०५.२०२२.
८. संचालनालयाचे पत्र क्र.एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/१०१०१ दि.२७.०७.२०२२.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय क्र.१ येथील शासन निर्णय व संचालनालयाचे संदर्भिय पत्र क्र. २ ते ६ च्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांनी अकृषि विद्यापीठे व संलग्ति महाविद्यालये यांना नॅक मूल्यांकन करुन घेण्याबाबत वेळोवेळी शासन निर्णय, शासन परिपत्रके, सुचनापत्र निर्गमित करण्यात आली आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात बहुसंख्य महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन / पुनर्मुल्यांकन प्रक्रीयेत सहभाग घेऊन नॅक कडून "नॅक मूल्यांकन दर्जा" प्राप्त करुन घेतला असून नॅकच्या विविध Cycles च्या (II, III,..... Cycle) कालावधीतही नॅक मूल्यांकन करुन घेतले आहे. NAAC मूल्यांकन हे महाविद्यालयाच्या गुणवत्तेचे मापदंड असून शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा धारण करणेसाठी दर पाच वर्षात महाविद्यालयाचे मूल्यांकन व पुनर्मुल्यांकन करुन घेणे बंधनकारक आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने महाविद्यालये / विद्यापीठ स्तरावर अभ्यासक्रम, बहुविद्याशाखीय शिक्षण, कौशल्य आधारीत अभ्यासक्रम, परिक्षा मुल्यमापन, अध्ययन अध्यापन, स्वायत्तता इत्यादी बाबतीत अमूलाग्र बदल होऊ घातलेले आहेत. या दृष्टीकोनातून महाविद्यालयांनी नॅक मानांकन व मूल्यांकनाच्या प्रक्रियेतून आपली गुणवत्ता राखणे, गुणवत्ता वाढ करणे अपेक्षित आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, नॅक बंगलोर, महाराष्ट्र शासन नॅक मानांकन व मूल्यांकनाबाबत आग्रही आहेत.

शासन निर्णय दि.०८.१०.२०१० नुसार "जी महाविद्यालये / संस्था नॅक मूल्यांकनाचा / पुनर्मुल्यांकनाचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे विहित मुदतीत पाठविणार नाहीत अशा महाविद्यालयाच्या विरुध्द संबंधित विद्यापीठाने असंलग्निकरण, इ.कारवाई करण्यासंदर्भात" संचालनालयामार्फत कळविण्यात आले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यानी नोटीस क्र.एफ-२०-४/२००९(आययुसी), दि.२९ जानेवारी, २०१५ मध्ये नॅक मूल्यांकन न करणाऱ्या महाविद्यालयांचे युजीसीचे अनुदान खंडीत करण्याची बाब नमूद केली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ मधिल पोटकलम ०६(क) (ख) नुसार "विद्यापीठ, नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा किंवा अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्र सुरु करण्यासाठीचे उच्च शिक्षणाच्या विद्यमान महाविद्यालयांचे किंवा परिसंस्थांचे अर्ज, जर

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
Registrar Office
Inward No. 1354
Date 15/10/2022
Section A.R.&D.
Clerk
Hon. Registrar

15/10/2022 6:10 PM Inward
Received 19/10/2022 12:34PM

(क) ते, अधिस्वीकृती अभिकरणाच्या मानकांनुसार अधिस्वीकृती किंवा पुनर्रअधिस्वीकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असले तरीसुध्दा, एकतर राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेकडून किंवा राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून अधिस्वीकृत किंवा पुनर्रअधिस्वीकृत करण्यात आले नसतील; आणि

(ख) राज्य शासनाने निर्धारित केलेल्या शर्तींचे ते अनुपालन करीत नसतील तर,

राज्य शासनाकडे पाठविणार नाही." अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० मधिल पोटकलम (४) नुसार "महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृती किंवा, यथास्थिति, पुनर्रअधिस्वीकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असेल आणि असे महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृतीच्या किंवा पुनर्रअधिस्वीकृतीच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यात कसूर करील तेव्हा, अशा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला विद्यापीठाकडून कोणतीही संलग्नता देण्यात येणार नाही." अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय दि.२५.०९.२००९, दि.३०.१०.२०१०, दि.०२.०९.२०१३, दि.१३.०९.२०१७, आणि दि.१५.०९.२०१७ नुसार नवीन महाविद्यालयास अनुदान मंजुर करतांना / अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांना / विद्याशाखा / अभ्यासक्रम / विषय / वाढीव तुकडया इत्यादींना शासनाकडून मंजुरी घेण्यासाठी संबंधीत महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन व मानांकन करुन घेतले नसेल तर सदर महाविद्यालयाचे अर्ज विद्यापीठांनी शासनाकडे शिफारशी करु नयेत अशी तरतूद आहे.

तसेच याचिका क्र. ५२८०/२०१५ मध्ये मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्या दि.१६.११.२०१६ च्या निकालातही नॅक मूल्यांकन व मानांकनाचे महत्व अधोरेखित केले आहे. याबाबत नॅक मूल्यांकन व मानांकन प्रक्रीयेद्वारे नॅक चा अपेक्षित दर्जा प्राप्त करुन घेणे आवश्यक व बंधनकारक असल्याचे शासनाकडून वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

तरी, आपल्या महाविद्यालयाने विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, नॅक बंगलोर व महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार अद्याप एकदाही नॅक मूल्यांकन / मानांकन प्रक्रियेत सहभाग घेतलेला नाही, असे निदर्शनास आले आहे. ही बाब प्रशासकीय व शैक्षणिकदृष्टया गंभीर स्वरुपाची आहे, तसेच आपण विहित तरतुदींचे उल्लंघन करीत असल्याचे ही निदर्शनास येत आहे.

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील वरील तरतूद, नॅक बंगलोर, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी निर्गमित निर्देश पाहता, **आपण पुढील ६ महिन्यांत नॅक मानांकन व मूल्यांकन प्रकिया पूर्ण करुन नॅकचा अपेक्षित दर्जा प्राप्त करुन घेणे बंधनकारक आहे.** अन्यथा, शासन नियमानुसार व प्रचलित धोरणानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ.धनराज माने)
**शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रत- माहितीस्तव सादर

१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मंत्रालय,मुंबई.
२. स्वीय सहाय्यक, मा.मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मंत्रालय,मुंबई.

प्रत- **माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. कुलसचिव, संबंधित अकृषि विद्यापीठे.
२. विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण) मुंबई, पुणे, पनवेल, औरंगाबाद, अमरावती, नांदेड, नागपूर.